**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**अमरावती विभागीय मंडळ,अमरावती.**

E-mail- divsecamt@rediffmail.com Ph.No. 0721-2662647


पत्र क्र.अविमं/लेखा/136
अमरावती.
दिनांक :- 18 /04/2024

**प्रति,**

मुख्याध्यापक/ प्राचार्य
अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ, वाशिम

**विषय :- माध्य. व उच्च माध्य. प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/ मार्च 2024 मधील इ. 10 वी व इ.12 वी चे मानधन देयके व खर्चाचे हिशोब पुस्तिका सादर करणेबाबत..**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्य. शालान्त प्रमाणपत्र प्रात्यक्षिक परीक्षा (इ.12 वी) दि. 02.02.2024 ते दि.20.02.2024 तसेच लेखी परीक्षा दि. 21.02.2024 ते दि. 26.03.2024 या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आली होती तसेच माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र प्रात्यक्षिक परीक्षा (इ. 10 वी ) दि. 10.02.2024 ते 29.02.2024 तसेच लेखी परीक्षा दि. 01.03.2024 ते दि. 26.03.2024 आणि दिव्यांग विद्यार्थ्यांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा दि. 27.03.2024 ते दि. 06.04.2024 या कालावधीमध्ये पूर्ण करण्यात आलेली आहे.

वरील परीक्षा संचलनामध्ये सहभागी घटक यामध्ये केंद्रप्रमुख,शाळा/क.महाविद्यालय,परिरक्षक, रनर यांचे देय होणारे मानधन व झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्ती इ.10 वी व 12 वीच्या निकालापूर्वी करण्याचे नियोजन आहे. यास्तव खालील संबंधितांनी 1) शाळा/क.महाविद्यालय यांनी 10 वी /12 वी परीक्षेच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या खर्चाची (हिशेबपुस्तीका),2)परिरक्षक व रनर यांची खर्चाचे हिशोब व मानधन मागणी विहीत नमुना-9 मध्ये आणि 3)उत्तरपत्रिका परिक्षण व समिक्षण याबाबतचे मानधन मागणी आणि 4) आय. टी. विषयाचे ऑनलाईन परीक्षेचे मानधन विहीत नमुना/देयकामाध्ये दि. 25/04/2024 पर्यंत टपालद्वारे अथवा हस्तपोहोच स्वखर्चाने या विभागीय मंडळ कार्यालयात सादर करणेबाबत संबंधितास आपले स्तरावरून कळवावे.

त्यानुसार पुढील कार्यवाही करून विहीत कालावधीत प्रदानाची कार्यवाही करणे या विभागीय मंडळास सोईचे होईल. विहीत कालावधीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रकरणी प्रदानास विलंब झाल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधिताची राहील,याची नोंद घ्यावी.

(निलीमा टाके)
**विभागीय सचिव**
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती.

E:\1 Dhiraj Pay Bill\Salary Employee\2 Letter.docx205